(50)

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** बीड **P.S.(ठाणे):** शिवाजीनगर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0045 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 23/01/2025 22:28

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार

**Time Period (कालावधी):** पहर 5

**Date From (दिनांक पासून):** 23/01/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 23/01/2025
**Time From (वेळेपासून):** 14:02 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:02 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 23/01/2025 **Time (वेळ):** 22:04 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 042

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 23/01/2025 22:04 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** महिला व बालविकास अधिकारी , कार्यालय,बीड,बीडचे बाबुराव वाघ हाईटस इमारती

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** मेघराज रामराव सानप

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 2001

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रा सानपवाडी ,बीड,शिवाजीनगर,बीड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रा सानपवाडी ,बीड,शिवाजीनगर,बीड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-7620378556

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | दिलीप किस्टय्या महालंके | | | 1. वरद प्राईट समोर निर्मळ सर यांच,यांचे घर धानोरा रोड, बीड, शिवाजीनगर,बीड,महाराष्ट्र,भारत<br>2. मयुर पार्क इंगळे करर्नर,श्रीकष्णा मंगल कार्यालयाचे बा,जळगाव रोड,छत्रपती संभाजीनगर, शिवाजीनगर,बीड,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**



Scanned with OKEN Scanner

(57)



| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | दि.23/01/2025 रोजीचे लाचमगाणी पडताळणी व सापळा कारवाई दरम्याचे एक मेमरी कार्ड व लाच रक्कम 500/रुपये | 500.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

500.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद ला.प्र.वि.कार्यालय बीड दिनांक:- 23/01/2025.

ला.प्र.वि.कार्यालय बीड दिनांक:- 23/01/2025.

मी मेघराज रामराव सानप, वय-24 वर्ष, व्यवसाय-शेती व शिक्षण रा.सानपवाडी ता.जि.बीड मो.क्र. 7620378556 आधार कार्ड क्र. 905558399077.

आज दि.23/01/2025 रोजी मी व माझी बहिण श्रीमती मोहर घुले असे लाचलुचपत प्रतिबंधक बीड येथे हजर येवुन श्री.युनुस शेख, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.बीड, यांचेसमक्ष तक्रार दिली की, "माझी बहिण नामे श्रीमती मोहर घुले हिचे मुलांचे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन एकपालक योजने करीता आवश्यक लागणारे कागदपत्र जमा करुन घेवुन अनुदानाचे काम लवकर करण्यास सांगण्यासाठी जिल्हा व महिला बालविकास अधिकारी कार्यालय, बीड येथील लिपीक श्री.महालंके हे माझी बहिण श्रीमती मोहर घुले हिचेकडे प्रत्येक फाईल करीता 250/- रुपये प्रमाणे दोन फाईलचे 500/- रुपयाची मागणी करीत आहेत " वगैरे मजकुराची तक्रार दिली.

मी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने पोनि/शेख यांनी दि.23/01/2025 रोजी श्री.महालंके, लिपीक, महिला व बालविकास अधिकारी कार्यालय, बीड हे माझी बहिण श्रीमती मोहर घुले हिचे कामासंदर्भाने आमच्याकडे लाचेची मागणी करतात किंवा कसे ? याबाबत मला, माझी बहिण श्रीमती मोहर घुले व पंच क्र.1 श्री.तुरकमारे यांना श्री. महालंके, लिपीक यांचेकडे महिला व बालविकास अधिकारी कार्यालय, बीड येथे पाठवुन लाचमागणी पडताळणी करण्याचे ठरले. पोनि/शेख यांनी मला, माझी बहिण श्रीमती मोहर घुले व पंचांना लाचमागणी पडताळणीचे अनुषंगाने सुचना देऊन व्हॉईस रेकॉर्डर बाबत माहिती देऊन प्रात्यक्षीक करुन दाखवले. पोनि/शेख यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन त्यामध्ये स्वत:, दोन्ही पंच, माझी बहिण श्रीमती मोहर घुले व माझे वक्तव्य ध्वनिमुद्रीत केले. त्यानंतर पोनि/शेख यांचे सुचनेवरुन पोशि/गवळी यांनी व्हाईस रेकॉर्डर माझे बनियनचे डावे बाजुस सुरक्षीत बांधुन पोनि/शेख यांनी व्हाईस रेकॉर्डर चालु करुन मला, माझी बहिण श्रीमती मोहर घुले यांना माझ्याकडे स्कुटीने व पंच क्र-1 श्री.तुरकमारे यांना दुसऱ्या मोटार सायकलने महिला व बालविकास अधिकारी कार्यालय, बीड येथे श्री.महालंके, लिपीक यांचेकडे पाठवुन व्हाईस रेकॉर्डरच्या मदतीने लाचमागणी पडताळणी केली असता, त्याठिकाणी माझी व बहिण श्रीमती मोहर घुले यांची लिपीक श्री.महालंके यांचेशी भेट झाली. भेटी दरम्यान माझी, बहिण श्रीमती मोहर घुले व लिपीक श्री.महालंके यांचेत माझे बहिणीचे कामासंदर्भाने चर्चा झाली. चर्चे दरम्यान माझी बहिण श्रीमती मोहर घुले हिने लिपीक श्री.महालंके यांना " भैय्या ला एकदा सांगाना समजुन " असे सांगीतले. त्यावर लिपीक श्री.महालंके यांनी मला " बाव्वीसे पन्नास रुपये महिना, पुढच्या वर्षी फक्त तीनच कागद द्यायचे, साडे सातशे, लवकर पाठविण्यासाठी, लवकर म्हणजे संस्थेला सांगुत आम्ही, पाचशे " असे म्हणुन माझ्याकडे प्रत्येक फाईलकरीता 250/- रुपये प्रमाणे दोन फाईलचे 500/- रुपये लाचेची पंचासमक्ष मागणी करुन लाच रक्कम लागलीच स्वत: स्विकारण्याचे मान्य केले.

त्यानुसार पोनि/शेख यांनी मला, माझी बहिण श्रीमती मोहर घुले व दोन्ही पंचांना लिपीक श्री.महालंके यांचेविरुध्द



Scanned with OKEN Scanner

लागलीच लाचेचा सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगीतले. पोनि/शेख यांनी वेळेअभावी केलेल्या सर्व कारवाई बाबत एकत्रित पंचनामा करण्यात येणार असल्याचे सांगीतले. पोनि/शेख यांनी सापळा कारवाईसाठी अँथ्रॉसीन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्पचा उपयोग होणार असल्याचे कळवुन त्याबाबत मला, माझी बहिण श्रीमती मोहर घुले व पंचाना माहिती देऊन प्रात्यक्षिक करुन दाखवुन नियोजित सापळा कारवाईचे अनुषंगाने मला, माझी बहिण श्रीमती मोहर घुले, पंच व सापळा पथकास सुचना दिल्या. पोनि/शेख यांनी माझेकडुन सापळा करवाईसाठी लागणारे 500/-रु ज्यामध्ये 100/-रु दराच्या 5 नोटा घेऊन त्यांचे नंबर व वर्णन पंच क्र.-2 श्री. खटाणे यांचे करवी नमुद करुन घेतले व त्यास अँथ्रॉसीन पावडर लावुन लाचेच्या नोटा माझे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशामध्ये ठेवल्या. पोनि/शेख यांनी मला लिपीक श्री.महालंके यांनी लाचेची मागणी केल्यास खिशात ठेवलेल्या लाचेच्या नोटा 500/-रु. काढुन श्री.महालंके यांना द्याव्यात व त्यांचे अंगावरील शर्टच्या दोन्ही बाहया दुमडुन वर घ्याव्यात असा इशारा नेमुन दिला.

त्यानंतर पोनि/शेख यांचे सुचनेवरुन पोशि/गवळी यांनी व्हाईस रेकॉर्डर माझे बनियनचे डावे बाजुस सुरक्षीत बांधुन पोनि/शेख यांनी व्हाईस रेकॉर्डर चालु करुन लाचमागणी पडताळणी दरम्यान ठरल्याप्रमाणे 500/-रु. लाच रक्कम लिपीक श्री.महालंके यांना देण्यासाठी मला व माझी बहिण श्रीमती मोहर घुले यांना माझ्याकडील स्कुटीने व पंच क्रमांक 1 श्री.तुरकमारे यांना दुसऱ्या मोटार सायकलने महिला व बालविकास अधिकारी कार्यालय, बीड येथे रवाना केले. पोनि/शेख हे सापळा पथकासह शासकीय वाहनाने आमचे पाठोपाठ येत होते. मी व माझी बहिण श्रीमती मोहर घुले माझ्याकडील स्कुटीने व पंच क्र.1 श्री.तुरकमारे असे त्यांचेकडील मोटार सायकलने महिला व बालविकास अधिकारी कार्यालय, बीड, बाबुराव वाघ हाईटस ईमारतीचे समोर गेलो. त्यावेळी लिपीक श्री.महालंके हे कार्यालयाचे ईमारती समोर जिन्या जवळ उभे होते. त्याठिकाणी आमची व लिपीक श्री.महालंके यांचेशी भेट झाली. भेटी दरम्यान लिपीक श्री.महालंके यांनी " झालय देऊन टाका " असे म्हणुन माझ्याकडे लाचेची मागणी केल्याने मी माझे उजवे हाताने पँटचे समोरील उजवे बाजुचे खिशातुन लाच रक्कम 500/-रुपये बाहेर काढून लिपीक श्री.महालंके यांचे समोर धरली असता, लिपीक श्री.महालंके यांनी लाचरक्कम 500/- रुपये उजव्या हाताने स्विकारुन शर्टचे समोरील डावे बाजुचे खिशात ठेवली. त्यावेळी माझी बहिण श्रीमती मोहर घुले हिने कागदपत्रांच्या मुळ फाईली लिपीक श्री. महालंके यांचेकडे दिल्याने त्यांनी सदरच्या फाईली डाव्या हातामध्ये घेवुन जिना चढुन कार्यालयाकडे जाऊ लागले त्यावेळी मी मला लाच स्विकारल्यानंतर करावयाचा नेमुन दिलेला पुर्वनियोजीत इशारा 14.02 वा. केला. इशारा प्राप्त होताच पोनि/शेख, सापळा पथकातील सदस्य व पंच क्र.2 श्री.खटाणे हे तात्काळ घटनास्थळी हजर येवुन लिपीक श्री.महालंके हे कार्यालयाचे ईमारतीचा जिना चढत असतांना त्यांना पकडले. पोनि/शेख यांचे सुचनेवरुन पोशि/गवळी यांनी माझ्याकडील व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन ताब्यात घेतले. पोनि/शेख यांनी लिपीक श्री. महालंके यांना त्यांची स्वत:ची, दोन्ही पंचांची व सापळा पथकातील सदस्यांची ओळख करुन दिली. पोनि/शेख यांनी पंच क्र-1 श्री.तुरकमारे यांना विचारणा केली की, मला कोणी लाचेची मागणी केली व माझे कडुन कोणी लाच रक्कम स्वीकारली. तेव्हा पंच क्र.-1 श्री.तुरकमारे यांनी सांगितले की, " लिपीक श्री.महालंके यांनी माझ्याकडे लाचेची मागणी करुन लाच रक्कम 500/- रुपये उजव्या हाताने स्विकारुन त्यांचे अंगावरील शर्टचे समोरील डावे बाजुचे खिशात ठेवली आहे " असा खुलासा पंच क्र.1 यांनी केला.

पोनि/शेख यांनी लिपीक श्री.महालंके यांना त्यांचे नाव पद पत्ता विचारला असता, त्यांनी त्यांचे नाव श्री.दिलीप किस्टय्या महालंके, वय-54 वर्ष, व्यवसाय-नौकरी, कनिष्ठ लिपीक, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय, बीड रा.मयुर पार्क इंगळे कॉर्नर श्रीकृष्णा मंगल कार्यालयाचे बाजुला जळगाव रोड, छत्रपती संभाजीनगर ह.मु.वरद प्राईट समोर निर्मळ सर यांचे घर धानोरा रोड, बीड (वर्ग-3) असे सांगीतले. पोनि/शेख यांनी लिपीक श्री. महालंके यांना लाचरकमे बाबत विचारणा केली असता त्यांनी लाच रक्कम त्यांचे अंगावरील शर्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिशात असल्याचे सांगीतले. त्यानंतर पोनि/शेख यांनी पंच क्र.2 श्री.खटाणे यांना लिपीक श्री.महालंके यांचे शर्टचे समोरील डावे बाजुचे खिशातुन लाच रक्कम ताब्यात घेऊन खात्री करण्यास सांगीतले. पंच क्र.1 श्री.तुरकमारे यांनी लाचेच्या नोटांचे वर्णन व क्रमांक नमुद असलेला कागदावरील नोटांचे क्रमांक वाचुन दाखवले असता पंच क्र.2 श्री.खटाणे यांनी लाचेच्या नोटांची खात्री करुन सापळापुर्व कारवाई दरम्यान नमुद केलेल्या नोटांशी वर्णन व क्रमांक एकच असल्याचे कळवुन लाचरक्कम 500/- रुपये सांगीतले. पोनि/शेख यांनी सदरच्या नोटा पंच क्र.2 यांना ताब्यात ठेवण्यास सांगीतले. पोनि/शेख यांनी लिपीक श्री.महालंके यांना माझ्या बहिणीचे कामासंदर्भातील मुळ कागदपत्रांचे फाईल बाबत विचारणा केली. त्यावेळी लिपीक श्री.महालंके यांनी त्यांचे डावे हातातील दोन मुळ कागदपत्रांचे फाईली पोनि/शेख यांचेकडे दिल्या. त्यानंतर पोनि/शेख यांनी सदर कागदपत्रांचे अवलोकन करुन घटनास्थळावरील प्राथमीक कारवाई करुन पुढील कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड येथे करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर पोनि/शेख, सापळा पथकातील सदस्य, पंच, लिपीक श्री.महालंके असे शासकीय



Scanned with OKEN Scanner

(5-2)



वाहनाने, पंच क्रमांक 1 श्री.तुरकमारे हे त्यांचेकडील मोटारसायकलने तसेच मी व माझी बहीण श्रीमती मोहर घुले असे माझ्याकडील स्कुटीने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड येथे हजर आलोत. त्याबाबत दि.23/01/2025 रोजी लाचमागणी पडताळणी, सापळापुर्व व यशस्वी सापळा कारवाईचा एकत्रीत सविस्तर पंचनामा केला आहे. तरी आज दि.23/01/2025 रोजी 13.13 वा ते 13.25 वा. चे दरम्यान श्री.दिलीप किस्टय्या महालंके, वय-54 वर्ष, व्यवसाय-नौकरी, कनिष्ठ लिपीक, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय, बीड रा.मयुर पार्क इंगळे कॉर्नर श्रीकृष्णा मंगल कार्यालयाचे बाजुला जळगाव रोड, छत्रपती संभाजीनगर ह.मु.वरद प्राईट समोर निर्मळ सर यांचे घर धानोरा रोड, बीड (वर्ग-3) यांनी माझी बहिण श्रीमती मोहर घुले हिचे मुलांचे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन एकपालक योजने करीता लागणारे आवश्यक कागदपत्र जमा करुन घेवुन अनुदानाचे काम लवकर करण्यास सांगण्यासाठी प्रत्येक फाईल 250/- रुपये प्रमाणे दोन फाईलचे 500/- रुपये पंचासमक्ष लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्वत: स्विकारण्याचे मान्य करुन आज दि.23/01/2025 रोजी 14.02 वा. लाचरक्कम 500/- रुपये महिला व बालविकास अधिकारी कार्यालय, बीडचे बाबुराव वाघ हाईटस इमारतीच्या समोर जिन्या जवळ पंचासमक्ष स्विकारले असता, लिपीक श्री.महालंके यांना लाचेच्या रकमेसह रंगेहाथ पकडले आहे. म्हणुन माझी लिपीक श्री.महालंके यांचेविरुध्द कायदेशीर फिर्यादि आहे.
हि फिर्याद दिली ती माझे सांगणेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली असुन मी वाचुन पाहिली बरोबर व खरी आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
~~Gajanan Jagannath Kshirsagar~~ P.I [illegible] A.C.B.
**Rank** (पद): SI (Sub-Inspector) **No.**(क्र.): 15101000402GJK
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)



Scanned with OKEN Scanner

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

पो.ठा.अमलदार

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Maruti Bhimsen Khe
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** 1460100450MBKM7901